# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## विद्यापीठ मुद्रणालय
## <u>जाहीर लिलावाची नोटीस</u>

संचालक विस्तार शिक्षण संचालनालय यांचे अधिनस्त विद्यापीठ मुद्रणालय डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ मुद्रणालय येथे असलेले अचल व दुरुस्त न होणारा कालबाहय यंत्रसाठा दिनांक २१/११/२०१९ गुरुवार रोजी दुपारी १.०० वाजता. संचालक, विस्तार शिक्षण, विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला या कार्यालयाचे अधिनस्त विद्यापीठ मुद्रणालयामध्ये जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येणार आहे.

सदरील वस्तु ज्यांना विकत घ्यावयाचे असतील त्यांनी लिलावाच्या वेळी लिलावाच्या अटी व शर्ती मान्य असल्यास अनामत रक्कम भरुन आधार कार्डसह कार्यालयीन वेळेत वरील दोन्हीही कार्यालयात पहावयास मिळतील. सदर नियत अटी व शर्ती विद्यापीठाच्या www.pdkv.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

प्रभारी अधिकारी
विद्यापीठ मुद्रणालय
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

## संचालक विस्तार शिक्षण, विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला अंतर्गत असलेल्या विद्यापीठ मुद्रणालय या कार्यालयातील अचल वस्तुसाठा लिलावाच्या अटी व शर्ती (लिलाव दिनांक 21/11/2019)

१. लिलावात निघालेल्या वस्तु जश्या आहेत व जिथे आहेत त्या तत्वावर निश्चीत केले आहे.
२. जुने निर्लेखीत वस्तुंचा लिलावात समावेश आहे.
३. ज्यांना लिलावात समावेश घ्यावयाचा आहे त्यांनी बोली सुरु होण्याआधी रु. १०००/– रोखीने भरणा करावे. ....दुपारी १.०० वाजता नंतर कुठलीही रक्कम स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
४. ज्यांनी अनामत रक्कम दुपारी १.०० वाजता च्या आत भरलेली असेल त्यांना नंबर देण्यात येईल व त्यांनाच लिलावाच्या ठिकाणी हजर राहून भाग घेता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस त्या ठिकाणी कुणा सोबत थांबता येणार नाही. ज्यांना अशा लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी अनामत रक्कम पूर्ण भरणा करुन सोबत आधार कार्डची झेरॉक्स आणावी.
५. लिलावाच्या वेळी संबंधीत कार्यालयातील व्यक्ती व समितीचे सदस्य उपस्थित असतील.
६. लिलाव समिती बोलणी बोलणा–या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली मान्य म्हणून मान्यता देण्यात येईल व हया बाबतचा गठीत समितीचा अंतीम निर्णय राहील.
७. अपेक्षीत किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे अथवा न करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
८. वस्तू बोली कायम झालयास सदर वस्तुच्या किंमती कायम झालेल्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम त्याच दिवशी व उर्वरीत रक्कम दुस–या दिवशी भरावी लागेल आणि दुस–या दिवशी उर्वरीत रक्कम न भरल्यास सदर वस्तुचा लिलाव रद्द करण्यात येईल व जमा असलेली रक्कम प्राप्त करुन विद्यापीठ निधीत जमा करण्यात येईल.
९. बोली कायम झाल्यास संबंधीत व्यक्तीनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने वाहून नेण्याची व त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्यांची स्वत:ची असेल.
१०.निर्णायक झालेली वस्तुची पुर्ण किंमत भरल्यानंतर सदर वस्तु खरेदीदाराने तीन दिवसाच्या आत विद्यापीठ परिसरातून स्वत:च्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर वस्तुची देखभालीची तद्वतच गहाळ झाल्यास विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही याची नोंद घ्यावी
११.ज्याची बोली अमान्य ठरली असेल त्यांना त्यांची रक्कम परत करण्यात येईल.
१२.लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी लेखी स्वरुपात दयावे अन्यथा नंतर तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही. तसेच सहभागी नसलेल्या व्यकतीचा यात समावेश राहणार नाही.
१३.लिलावात काही अडचण निर्माण झाल्यास/वाद निर्माण झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतीम व सर्वांना बंधनकारक राहील.
१४.लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखुन ठेवला आहे बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे जाहीर करण्यात येईल.

प्रभारी अधिकारी
विद्यापीठ मुद्रणालय
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला - ४४४ १०४

# लिलावात सहभागी होण्याकरीता भरावयाचा अर्ज

१. संपूर्ण नांव :..................................................................................................

२. संपूर्ण पत्ता : ...............................................................................................

३. मोबाईल नं. ....................................................................................................

४. भरणा केलेली रक्कम ........................................................................................

५. आधार कार्ड नं. ..........................................(आधार कार्डची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे.)

(लिलावात सहभागी होण्याकरीता सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. करीता अर्ज भरला आहे.)

दिनांक / /२०१९

सही ..........................